सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१

# मुंबई अभ्यस्त अपराधी अधिनियम, १९५९

**(३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारलेला)**

## BOMBAY Act No. LXI of 1959

## The Bombay Habitual Offenders Act, 1956

*(As modified upto 3rd November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत रु. ६/-]

# मुंबई अभ्यस्त अपराधी अधिनियम, १९५९.

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे


### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

### प्रकरण दोन

### अभ्यस्त अपराध्यांची नोंदणी व त्यांच्या हालचालींवर निर्बंध

३. अभ्यस्त अपराध्यांच्या नोंदणीबाबत निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

४. अभ्यस्त अपराध्यांची नोंदवही तयार करण्याची कार्यपद्धती.

५. नोंदवहीचा ताबा आणि त्यातील फेरफार.

६. बोटे व तळहात आणि पावले यांचे कोणत्याही वेळी ठसे घेण्याचा व छायाचित्रे काढण्याचा अधिकार.

७. नोंदणी केलेल्या अपराध्यांनी राहण्याच्या ठिकाणातील बदल कळविणे व स्वतः हजर राहणे.

८. अभ्यस्त अपराध्याचे राहण्याचे ठिकाण इतर जिल्ह्यात बदलल्यावर जिल्हा दंडाधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.

९. अभ्यस्त अपराध्यांची नोंदणी व पुनर्नोंदणी करण्याचा कालावधी.

१०. पुनर्नोंदणी वगैरे विरुद्ध निवेदन करण्याचा हक्क.

११. नोंदणीकृत अपराध्यांच्या हालचालींवर निर्बंध घालण्याचा अधिकार.

१२. हालचालीवरील निर्बंध काढून टाकण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा अधिकार.

१३. कलम ११ व १२ याअन्वयेचे अधिकारसुद्धा विवक्षित दंडाधिकाऱ्यास वापरता येतील.

## प्रकरण तीन

## अभ्यस्त अपराध्यांना सुधारणा प्रशिक्षण देणे

१४. सुधारणा वसाहती स्थापन करणे.

१५. अभ्यस्त अपराध्यांना सुधारणा प्रशिक्षण घेण्याबाबत निदेश देण्याचा अधिकार.

१६. एका सुधारणा वसाहतीतून दुसऱ्या वसाहतीत पाठविण्याचा किंवा सुधारणा वसाहतीतून काढून टाकण्याचा अधिकार.

## प्रकरण चार

## शास्ती व कार्यपद्धती

१७. अधिनियमाच्या विवक्षित तरतुदींचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

१८. निर्बंध क्षेत्राच्या किंवा सुधारणा वसाहतीच्या बाहेर आढळलेल्या व्यक्तीस अटक करणे.

१९. मूर्वी दोषी ठरविण्यात आलेल्या विवक्षित व्यक्तींना वाढीव शिक्षा देणे.

२०. संशयास्पद स्थितीत आढळून येतील अशा विवक्षित नोंदणीकृत अपराध्यास शिक्षा.

२१. अभ्यस्त अपराध्यास अटक करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

२२. अधिकारितेस रोध.

२३. वैध कारवाईस रोध.

२४. अधिकार सोपविणे.

२५. नियम करण्याचा अधिकार.

२६. व्यावृत्ती.

२७. निरसन व व्यावृत्ती.

अनुसूची.

# सन १९५९ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ६१

## [१][ मुंबई अभ्यस्त अपराधी अधिनियम, १९५९]

(२६ ऑक्टोबर १९५९)

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे अनुकूलन व रूपभेद करण्यात आले.

खालील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या :-

१९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

**अभ्यस्त अपराध्यांस देण्यात येणारी वागणूक व प्रशिक्षण याबाबत आणि विवक्षित इतर गोष्टींबाबत अधिक चांगली तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** अभ्यस्त अपराध्यांस देण्यात येणारी वागणूक व प्रशिक्षण यांबाबत आणि विवक्षित इतर गोष्टींबाबत अधिक चांगली तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** आता भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास ''मुंबई अभ्यस्त अपराधी अधिनियम, १९५९'' असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण [२][महाराष्ट्र राज्यास] लागू असेल.

(३) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील त्या तारखेस, तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भावरून दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,- व्याख्या.

१८९८ चा ५. (अ) ''संहिता'' याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ असा आहे;

(ब) ''सुधारणा वसाहत'' याचा अर्थ, कलम १४ अन्वये सुधारणा वसाहत म्हणून स्थापन केलेली, मान्य केलेली किंवा प्रमाणित केलेली कोणतीही जागा, असा आहे;

(क) ''जिल्हा'' या संज्ञेत, बृहन्मुंबईचा समावेश होतो;

(ड) ''जिल्हा दंडाधिकारी'' याचा अर्थ-

(एक) बृहन्मुंबईत, पोलीस आयुक्त, असा आहे;

[३] * * * * *

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९५९, भाग पाच, पृ. ३४७ पहा.

२. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये '' मुंबई राज्य'' याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

३. सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ कलम २ (२) अनुसूची अन्वये उपखंड (दोन) वगळण्यात आला.

(इ) ''अभ्यस्त अपराधी'' याचा अर्थ, ज्या कोणत्याही व्यक्तीस ती अठरा वर्षे वयाची झाल्यापासून,–

(एक) कोणत्याही पाच वर्षांच्या लागोपाठच्या मुदतीत (मग अशी मुदत या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वीची असो किंवा त्यानंतरची असो किंवा ती अंशतः अशा प्रारंभापूर्वीची आणि अंशतः त्यानंतरची असो) एकाच कृतीचा भाग होतील अशा रीतीने संबंधित नसलेल्या अनुसूचीत अपराधांपैकी एक किंवा अधिक अपराध निरनिराळ्या प्रसंगी केल्याबद्दल, सिद्धापराध ठरविण्यात आल्यावर तीनपेक्षा कमी नाही इतक्या वेळा भरीव मुदतीची कारावासाची शिक्षा देण्यात आली असेल, आणि

(दोन) अशी शिक्षा अपिलांत किंवा फेरतपासणीत फिरविण्यात आली नसेल अशी व्यक्ती असा आहे:

परंतु, पूर्वोक्त लागोपाठ पाच वर्षांची मुदत मोजताना, कारावासाच्या शिक्षेमुळे किंवा स्थानबद्ध केल्यामुळे तुरुंगात घालविलेला कोणताही कालावधी हिशेबात घेण्यात येणार नाही;

(फ) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे;

(ग) ''नोंदणी केलेला अपराधी'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये नोंदणी केलेला किंवा पुन्हा नोंदणी केलेला अभ्यस्त अपराधी असा आहे;

(ह) ''अनुसूचीत अपराध'' याचा अर्थ, अनुसूचीत निर्दिष्ट केलेला किंवा त्यासारखा असणारा अपराध असा आहे;

(आय) ''पोलीस अधीक्षक'' याचा अर्थ, बृहन्मुंबईत, राज्य शासनाने या अधिनियमान्वये पोलीस अधीक्षकाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नेमलेला कोणताही अधिकारी असा आहे.

## प्रकरण दोन

## अभ्यस्त अपराध्यांची नोंदणी व त्यांच्या हालचालींवर निर्बंध

अभ्यस्त अपराध्यांच्या नोंदणीबाबत निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

३. राज्य शासनाला जिल्हा दंडाधिकाऱ्यास त्याच्या जिल्ह्यांतील अभ्यस्त अपराध्यांची नोंदवही ठेवण्याबाबत व तीमध्ये अशा अपराध्यांची नावे व इतर विहित तपशील नोंदण्याबाबत निदेश देता येईल.

अभ्यस्त अपराध्यांची नोंदवही तयार करण्याची कार्यपद्धती.

४. कलम ३ अन्वये दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी, जिल्हा दंडाधिकारी किंवा त्याने याबाबतीत नियुक्त केलेला कोणताही अधिकारी, विहित नमुन्यातील व विहित रीतीने बजावलेल्या नोटिशीद्वारे जिल्ह्यांतील प्रत्येक अभ्यस्त अपराध्यास,–

(अ) नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वेळी व जागी त्याच्यापुढे हजर राहण्यास;

(ब) अभ्यस्त अपराध्यांचे नाव व इतर विहित तपशील याची नोंदवहीत नोंद करणे त्याला शक्य व्हावे म्हणून आवश्यक असेल अशी माहिती पुरविण्यास; आणि

(क) अभ्यस्त अपराध्याची बोटे, तळहात व पावले यांचे ठसे घेऊ देण्यास आणि छायाचित्र काढू देण्यास

फर्मावील :

परंतु असे की, अभ्यस्त अपराध्याचे नाव व विहित केलेला इतर तपशील याची नोंदवहीत नोंद का करण्यात येऊ नये याबाबत कारण दर्शविण्याची वाजवी संधी त्याला दिल्याशिवाय नोंदवहीत अशी नोंद करण्यात येणार नाही.

नोंदवहीचा ताबा आणि त्यातील फेरफार.

५. (१) नोंदवही जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकाच्या ताब्यात ठेवण्यात येईल व नोंदवहीत जे कोणते फेरफार करावे असे त्याचे मत असेल त्याबाबत तो, वेळोवेळी, जिल्हा न्यायाधीशास, कळवील.

(२) नोंदवही पोलीस अधीक्षकाच्या ताब्यात ठेवण्यात आल्यानंतर, जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या लेखी आदेशाखेरीज किंवा तदन्वये असेल ते खेरीजकरून नोंदवहीत कोणतीही नवीन नोंद करण्यात येणार नाही किंवा त्यातील कोणतीही नोंद रद्द करण्यात येणार नाही.

बोटे व तळहात आणि पावले यांचे कोणत्याही वेळी ठसे घेण्याचा व छायाचित्रे काढण्याचा अधिकार.

६. जिल्हा दंडाधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबतीत नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास कोणत्याही नोंदणी केलेल्या अपराध्याची बोटे, तळहात आणि पावले यांचे ठसे घेण्याचा व छायाचित्रे काढण्याचा आदेश देता येईल.

नोंदणी केलेल्या अपराध्यांनी राहण्याच्या ठिकाणांतील बदल कळविणे व स्वतः हजर राहणे.

७. (१) नोंदणी केलेला प्रत्येक अपराधी, विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्यास आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने आपल्या सामान्यपणे राहण्याच्या ठिकाणातील कोणताही बदल किंवा नियोजित बदल कळवील :

परंतु असे की, अपराधी आपले सामान्यपणे राहण्याचे ठिकाण दुसऱ्या जिल्ह्यांत बदलील (मग तो त्या राज्यात असो किंवा नसो) किंवा त्याचा असे ठिकाण बदलण्याचा इरादा असेल तर त्या बाबतीत, त्याने तो बदल किंवा नियोजित बदल जिल्हा दंडाधिकाऱ्यास कळविला पाहिजे.

(२) जिल्हा दंडाधिकारी लेखी आदेशाद्वारे असा निदेश देईल की, कोणताही नोंदणी केलेला अपराधी,–

(अ) प्रत्येक महिन्यात एकदा किंवा जिल्हा दंडाधिकारी आदेशात विनिर्दिष्ट करील त्या कारणासाठी तसा निदेश देईल तर, अनेक वेळा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्यासमोर आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने स्वतः हजर राहील, आणि

(ब) आपल्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणी गैरहजर राहणार असेल किंवा गैरहजर राहण्याचा उद्देश असेल तर त्या बाबतची सूचना प्राधिकाऱ्यास देईल:

परंतु असे की, जिल्हा दंडाधिकाऱ्यास त्यास वाजवी वाटेल अशा मुदतीपर्यंत आणि अशा शर्तीवर, अशा अपराध्यास त्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणी हजर नसल्याबाबतची किंवा हजर नसण्याचा उद्देश असल्याबाबतची सूचना देण्यापासून सूट देण्याचा अधिकार असेल.

अभ्यस्त अपराध्याचे राहण्याचे ठिकाण इतर जिल्ह्यात बदलल्यावर जिल्हा दंडाधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.

८. (१) नोंदणी केलेल्या कोणत्याही अपराध्याने त्याचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण राज्यातील दुसऱ्या जिल्ह्यात बदलले असेल अशा बाबतीत, ज्या जिल्ह्यात अपराध्याची नोंदणी करण्यात आली असेल त्या जिल्ह्याचा दंडाधिकारी, दुसऱ्या जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्यास अशा बदलाबाबत कळवील आणि त्याचवेळी नोंदवहीतील, नोंदणीकृत अपराध्याचे नाव व त्याचा त्या संबंधातील तपशील त्यास पुरवील.

(२) अशी माहिती मिळाल्यानंतर दुसऱ्या जिल्ह्याचा दंडाधिकारी नोंदणीकृत अपराधी व्यक्तींच्या नावाची व त्यांचे बाबतीत पुरविण्यात आलेल्या इतर तपशीलाची आपल्या नोंदवहीत नोंद करील आणि अशी नोंदणी प्रथमतः ज्या जिल्ह्यात करण्यात आली असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यास कळवील आणि त्यानंतर असा जिल्हा दंडाधिकारी त्याच्या नोंदवहीतील उक्त व्यक्तींच्या संबंधातील नोंद रद्द करील :

परंतु असे की, जर कोणत्याही नोंदणीकृत अपराध्याने त्याचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण राज्याबाहेरील दुसऱ्या जिल्ह्यात बदलले असेल तर पहिल्या जिल्ह्याचा जिल्हा दंडाधिकारी, दुसऱ्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यास नोंदणीकृत अपराध्याचे नाव व इतर तपशील पुरवितांना, उक्त दुसऱ्या जिल्ह्यात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये अपराधी व्यक्तीच्या संबंधात जे उपाय योजण्यात आले असतील, ते उपाय कोणतेही असल्यास, त्याला कळविण्याबद्दल उक्त जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्यास विनंती करील आणि अशी माहिती मिळाल्यानंतर पहिल्या जिल्ह्याचा दंडाधिकारी, उक्त अपराधी व्यक्तीच्या संबंधातील नोंद आपल्या नोंदवहीतून रद्द करील.

(३) नोंदणी केलेल्या अपराध्याचे नाव व इतर तपशील पोट कलम (२) अन्वये राज्यातील कोणत्याही नोंदवहीत दाखल करण्यात आल्यावर, त्याने त्याचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण ज्या जिल्ह्यात बदलले असेल त्या जिल्ह्याच्या नोंदवहीत, कलम ३ अन्वये दिलेल्या निदेशास अनुसरून, त्याची नोंदणी करण्यात आलेली आहे असे समजून त्या अधिनियमाच्या व तद्न्वये केलेल्या नियमांच्या तरतुदी त्याला लागू होतील.

अभ्यस्त अपराध्यांची नोंदणी व पुनर्नोंदणी करण्याचा कालावधी.

९. (१) पोट कलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने या अधिनियमान्वये अभ्यस्त अपराध्याची केलेली नोंदणी ही, ती यापूर्वीच रद्द करण्यात आली नसल्यास, अशी नोंदणी करण्यात आल्याच्या तारखेपासून ५ वर्षांची मुदत संपल्यानंतर, अंमलात असण्याचे बंद होईल आणि नोंदणी अशा रीतीने रद्द करण्यात आल्यावर किंवा नोंदणी समाप्त झाल्यावर अभ्यस्त अपराधी हा, नोंदणीकृत अपराधी असणार नाही.

(२) नोंदणी रद्द करण्यात आली असली किंवा नोंदणीची मुदत संपली असली तरीही, नोंदणी अशा प्रकारे रद्द करण्यात आल्यानंतर किंवा मुदत संपल्यानंतर, कोणत्याही वेळी, अनुसूचीत अपराधांपैकी एका किंवा अनेक अपराधांसाठी अभ्यस्त अपराध्यास जितक्या वेळा दोषी ठरविण्यात येईल तितक्या वेळा त्याची या अधिनियमाच्या नोंदणी संबंधातील तरतुदीनुसार पुन्हा नोंदणी करण्यात येईल आणि पोट कलम (३) च्या तरतुदीच्या अधीनतेने पुन्हा करण्यात आलेली नोंदणी ही, ती यापूर्वीच रद्द करण्यात आली नसेल तर, अशी पुनर्नोंदणी करण्यात आलेल्या तारखेपासून ५ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, अंमलात असण्याचे समाप्त होईल.

(३) जर नोंदणीकृत अपराध्यास नोंदणीच्या किंवा पुनर्नोंदणीच्या मुदतीत, अनुसूचीतील अपराधांपैकी एका किंवा अनेक अपराधांबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आले असेल आणि तिला कारावासाची मूळ शिक्षा देण्यात आली असेल तर नोंदणीची किंवा पुनर्नोंदणीची मुदत ही, त्यास अशा कारावासाच्या शिक्षेतून ज्या तारखेस मुक्त करण्यात आले असेल त्या तारखेपासून ५ वर्षे मुदतीपर्यंत वाढविण्यात येईल.

पुनर्नोंदणी वगैरे विरुद्ध निवेदन करण्याचा हक्क.

१०. (१) कलम ४ अन्वये किंवा यथास्थिति कलम ९ अन्वये किंवा कलम ७, पोट कलम (२) खालील आदेशान्वये नावाची नोंदणी किंवा पुनर्नोंदणी करण्यात आल्यामुळे अन्याय झालेल्या कोणत्याही व्यक्तीला विहित मुदतीत, अशा नोंदणीविरुद्ध किंवा पुनर्नोंदणीविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे निवेदन करता येईल.

(२) राज्य शासन निवेदने विचारात घेतल्यानंतर आणि पीडित व्यक्तीला तिची बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्यावर यथास्थिति, नोंदणी, पुनर्नोंदणी किंवा आदेश कायम करील किंवा तो रद्द करील आणि कायम करण्यात आला असेल त्याबाबतीत त्या बद्दलची कारणे थोडक्यात नमूद करील.

नोंदणीकृत अपराध्यांच्या हालचालींवर निर्बंध घालण्याचा अधिकार.

११. (१) राज्य शासनाच्या मते सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट असेल तर राज्य शासनास, पोट कलम (४) च्या तरतुदींच्या अधीनतेने आदेशाद्वारे आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात आणि तीन वर्षांहून अधिक असणार नाही अशा मुदतीपर्यंत, कोणत्याही नोंदणीकृत अपराध्यांच्या हालचालींवर निर्बंध घालण्यात यावे असा निदेश देता येईल.

(२) असा कोणताही आदेश देण्यापूर्वी, राज्य शासन पुढील गोष्टी विचारात घेईल, त्या म्हणजे –

(अ) नोंदणीकृत अपराध्यास ज्या अपराधाबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आले असेल त्या अपराधाचे स्वरूप आणि ज्या परिस्थितीत अपराध करण्यात आला असेल ती परिस्थिती;

(ब) नोंदणीकृत अपराधी कोणताही कायदेशीर व्यवसाय करतो किंवा कसे आणि असा व्यवसाय प्रामाणिक व स्थिर जीवनास हितकारक आहे किंवा कसे किंवा त्यामुळे अपराध करण्याचे काम सुलभ व्हावे म्हणून ते केवळ एक ढोंग आहे किंवा कसे;

(क) ज्या क्षेत्रापुरत्या हालचाली करण्याबाबतचे निर्बंध घालण्यात येतील ते क्षेत्र योग्य आहे किंवा कसे; आणि

(ड) निर्बंधित क्षेत्रात, नोंदणीकृत अपराधी ज्या रीतीने आपली उपजीविका करू शकेल ती रीत आणि त्यासाठी उपलब्ध असलेली किंवा उपलब्ध करून देण्यात येणारी व्यवस्था पुरेशी आहे किंवा कसे.

(३) आदेशाची एक प्रत नोंदणीकृत अपराध्यांवर, विहित रीतीने बजावण्यात येईल.

(४) पोट कलम (१) खालील आदेशात विनिर्दिष्ट केलेली मुदत ही, कोणत्याही बाबतीत, कलम ९ मध्ये निर्देशित केलेल्या नोंदणीच्या किंवा यथास्थिति पुनर्नोंदणीच्या मुदतीहून अधिक वाढविण्यात येणार नाही.

हालचालीवरील निर्बंध काढून टाकण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा अधिकार.

१२. राज्य शासनास, आदेशाद्वारे, कलम ११ अन्वये दिलेला कोणताही आदेश रद्द करता येईल किंवा उक्त कलमाखालील आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्रात बदल करता येईल :

परंतु असे की, असा आदेश देण्यापूर्वी, राज्य शासन कलम ११, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी, त्या जेथवर लागू करता येतील तेथवर, विचारात घेईल.

कलम ११ व १२ याअन्वयेचे अधिकारसुद्धा विवक्षित दंडाधिकाऱ्यास वापरता येतील.

१३. (१) पोट कलम (३) च्या तरतुदीच्या अधीनतेने, कलम ११ व १२ खालील राज्य शासनाचे अधिकार, संहितेच्या कलम ११० अन्वये कार्यवाही करण्याचा अधिकार असणाऱ्या दंडाधिकाऱ्यास वापरता येतील; परंतु असे करताना संहितेच्या त्या कलमाखालील अधिकारांचा वापर करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(२) कलम ११ व १२ अन्वये कारवाई करणाऱ्या दंडाधिकाऱ्याने सद्‌वर्तनाबद्दल तारण देण्यास फर्मावणारा आदेश देताना संहितेची कलमे ११२, ११३, ११४, ११५ व ११७ मध्ये दिलेली कार्यपद्धती यथाशक्य अनुसरली पाहिजे :

परंतु असे की, संहितेचे कलम ११२ यात उल्लेख केलेल्या लेखी आदेशात मिळालेल्या माहितीचा गोषवारा देण्यात येईल व त्याशिवाय निर्बंधाचा आदेश ज्या मुदतीत अंमलात राहील अशी तीन वर्षापेक्षा अधिक नसेल अशी मुदत दर्शविण्यात येईल.

(३) अभ्यस्त अपराध्याच्या बाबतीत राज्य शासनाने कलम ११ अन्वये पूर्वीच आदेश दिला असेल अशा बाबतीत राज्य शासनाने दिलेला आदेश ज्या मुदतीत अंमलात असेल अशा कोणत्याही मुदतीत, दंडाधिकारी या कलमाखालील अधिकारांपैकी कोणतेही अधिकार वापरणार नाही.

## प्रकरण तीन

## अभ्यस्त अपराध्यांना सुधारणा प्रशिक्षण देणे

सुधारणा वसाहती स्थापन करणे.

१४. (१) या अधिनियमान्वये सुधारणा प्रशिक्षण घेण्याबाबत निदेश दिलेला असेल अशा अभ्यस्त अपराध्यांना ठेवण्यासाठी राज्य शासनास **शासकीय राजपत्रांतील** अधिसूचनेद्वारे त्यास योग्य वाटतील अशा सुधारणा वसाहती राज्यात स्थापन करता व चालवता येतील.

(२) राज्य शासनास, खाजगीरीत्या चालविण्यात येणारी कोणतीही संस्था (मग ती वसाहत म्हणून किंवा अन्य नावाने ओळखण्यात येत असो) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ सुधारणा वसाहत म्हणून मान्य किंवा प्रमाणित करता येईल.

अभ्यस्त अपराध्यांना सुधारणा प्रशिक्षण घेण्याबाबत निदेश देण्याचा अधिकार.

१५. (१) नोंदणीकृत अपराध्याची सुधारणा करण्यासाठी व गुन्ह्यास प्रतिबंध करण्याकरिता अशा नोंदणीकृत अपराध्यास त्याच्या वर्तणुकीत सुधारणा होईल अशा स्वरूपाचे प्रशिक्षण बराच काळ देणे इष्ट आहे अशी जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या प्रतिवृत्तावरून किंवा अन्य प्रकारे राज्य शासनाची खात्री होईल अशा बाबतीत अशा नोंदणीकृत अपराध्यास त्याच्या नोंदणीच्या किंवा पुनर्नोंदणीच्या मुदतीपेक्षा अधिक नसेल अशा, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या मुदतीकरिता सुधारणा प्रशिक्षण देण्यात यावे असा निदेश शासन देऊ शकेल.

(२) अभ्यस्त अपराध्याचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नसेल, अशा बाबतीत,–

(अ) कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल अशा कोणत्याही अपराधासाठी त्याला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

(ब) संहितेच्या कलम ११० अनुसार त्याला सद्वर्तनाबद्दल बंधपत्र देण्यास फर्मावले असेल व त्या दाव्यातील पुरावा व अभिलेखातील इतर सामग्री यावरून अशा अपराध्यास सुधारण्याच्या आणि गुन्ह्यास प्रतिबंध करण्याच्या हेतूने त्यास चारित्र्यात सुधारणा होईल अशा प्रकारचे प्रशिक्षण दीर्घ मुदतीसाठी देणे इष्ट आहे अशी न्यायालयाची किंवा दंडाधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर अशा न्यायालयास किंवा दंडाधिकाऱ्यास अशा अपराध्यास अशा अपराधाबद्दल यथास्थिति शिक्षा देण्याऐवजी किंवा असे बंधपत्र देण्याबाबत फर्माविण्याऐवजी, न्यायालय किंवा दंडाधिकारी निर्धारित करील अशा २ वर्षांपेक्षा कमी व ५ वर्षांपेक्षा जास्त नसेल इतक्या मुदतीकरिता सुधारणा प्रशिक्षण देण्यात यावे, असा निदेश देता येईल.

(३) पोट कलम (१) किंवा पोट कलम (२) अन्वये कोणताही निदेश देण्यापूर्वी, राज्य शासनाने, न्यायालयाने किंवा यथास्थिति दंडाधिकाऱ्याने,–

(अ) सुधारणा वसाहतीत किती अभ्यस्त अपराधी घेता येतील याबाबत सुधारणा अधिकाऱ्याशी विचारविनिमय केला पाहिजे;

(ब) अपराध्याची शारीरिक व मानसिक स्थिती व त्याची सुधारणा वसाहतीत सुधारणा प्रशिक्षण घेण्याची क्षमता विचारात घेतली पाहिजे; आणि

(क) असा निदेश का देण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखविण्याची वाजवी संधी अपराध्यास दिली पाहिजे.

(४) ज्याच्या बाबतीत सुधारणा प्रशिक्षण घेण्याबाबत निदेश देण्यात आले असतील असा अभ्यस्त अपराधी त्याच्या प्रशिक्षणाच्या कालावधीत सुधारणा वसाहतीत राहील व अशा वसाहतीत असताना त्याला विहित करण्यात येईल अशा रीतीने वागविण्यात येईल व विहित प्रशिक्षण देण्यात येईल.

एका सुधारणा वसाहतीतून दुसऱ्या वसाहतीत पाठविण्याचा किंवा सुधारणा वसाहतीतून काढून टाकण्याचा अधिकार.

१६. राज्य शासनास किंवा राज्य शासन याबाबत प्राधिकृत करील अशा कोणत्याही अधिकाऱ्यास कोणत्याही वेळी लेखी आदेशाद्वारे सुधारणा वसाहतीतील कोणत्याही अभ्यस्त अपराध्यास दुसऱ्या सुधारणा वसाहतीत पाठविण्याबाबत किंवा वसाहतीतून काढून टाकण्याबाबत निदेश देता येईल आणि त्याप्रमाणे त्यास दुसऱ्या सुधारणा वसाहतीत पाठविण्यात येईल किंवा यथास्थिति, वसाहतीतून काढून टाकण्यात येईल.

## प्रकरण चार

### शास्ती व कार्यपद्धती

१७. अभ्यस्त अपराधी जी सिद्ध करण्याची जबाबदारी त्याची असेल अशी वैध सबब असल्या-खेरीज इतर बाबतीत,— अधि-नियमाच्या विवक्षित तरतुदींचे पालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

(अ) कलम ४ अन्वये काढलेल्या नोटिशीनुसार हजर रहाण्यात कसूर करील, किंवा

(ब) त्या कलमान्वये आवश्यक असेल ती कोणतीही माहिती देण्यात जाणीवपूर्वक कसूर करील किंवा जी माहिती खोटी आहे हे त्यास माहीत असेल किंवा त्यास असे सकारण वाटत असेल किंवा ती खरी नाही, यावर त्याचा विश्वास असेल अशी माहिती, खरी म्हणून सादर करील, किंवा

(क) कलम ६ अन्वये दिलेल्या आदेशान्वये काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस त्याच्या बोटाचे व हाताचे ठसे, पायाचे ठसे व छायाचित्रे घेऊ देण्यास नकार देईल, किंवा

(ड) कलम ७, पोटकलम (१) च्या तरतुदी किंवा त्या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये जिल्हा दंडाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचे किंवा कलम ११ अन्वयेच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करील,

तर त्यास अधिपत्राबाचून अटक करण्यात येईल आणि त्यास—

(एक) पहिल्या दोषसिद्धीनंतर ६ महिने पर्यंत वाढविता येईल अशा मुदतीची कैदेची किंवा २०० रुपयांपर्यंत वाढविता येईल अशा द्रव्यदंडाची किंवा या दोन्हीही शिक्षा होतील, आणि

(दोन) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या कोणत्याही दोषसिद्धीनंतर १ वर्षापर्यंत वाढविता येईल अशा मुदतीची कैदेची किंवा ५०० रुपयांपर्यंत वाढवता येईल अशा द्रव्यदंडाची किंवा या दोन्हीही शिक्षा होतील :

परंतु, अपराध्याचे वय व त्याची शारीरिक व मानसिक अवस्था व सुधारणा वसाहतीत चारित्र्य सुधार प्रशिक्षण घेण्याची त्याची योग्यता या गोष्टी विचारात घेतल्यानंतर न्याया-लयाची जर अशी खात्री होईल की, त्याच्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने व गुन्ह्यास प्रतिबंध करण्यासाठी त्याला चारित्र्य सुधार प्रशिक्षण देण्यासाठी दीर्घ मुदतीकरिता एखाद्या सुधारणा वसाहतीत ठेवणे इष्ट आहे तर, त्यास कारण दाखविण्याची संधी दिल्यानंतर, (आणि त्या सुधारणा वसाहतीत त्याला सामावून घेण्याबाबत सुधारणा अधिकाऱ्याचा सल्ला घेतल्यानंतर) या कलमान्वये अपराध्यास कोणतीही शिक्षा देण्याऐवजी त्यास सन्मार्गप्रवर्तक शिक्षण घेण्यासाठी न्यायालय ठरवील अशा ३ वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीसाठी सुधारणा वसाहतीत ठेवण्यात यावे असा निदेश न्यायालय देऊ शकेल.

१८. कोणतीही व्यक्ती— निर्बंध क्षेत्राच्या किंवा सुधारणा वसाहतीच्या बाहेर आढळलेल्या व्यक्तीस अटक करणे.

(अ) ज्या शर्तीवर तिला असे क्षेत्र सोडून जाण्याची परवानगी असेल त्या शर्तीचे उल्लंघन करून ज्या क्षेत्रापुरत्या तिच्या हालचाली मर्यादित करण्यात आल्या असतील त्या क्षेत्राबाहेर गेल्याचे आढळून येईल, किंवा

(ब) ज्या कोणत्याही सुधारणा वसाहतीत तिला ठेवले असेल तेथून पळून जाईल तर

एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास, पोलीस पाटलास किंवा गावच्या पहारेकऱ्यास तिला अधिपत्रा-वाचून अटक करता येईल आणि दंडाधिकाऱ्यापुढे नेता येईल. अशा दंडाधिकाऱ्यास वरील गोष्टी सिद्ध झाल्यास, अशा व्यक्तीला अशा क्षेत्रात किंवा अशा सुधारणा वसाहतीत घेऊन जाण्याबद्दल आणि हा अधिनियम व तदन्वये केलेले कोणतेही नियम यास अनुसरून तिच्याविरुद्ध कारवाई करण्याबद्दल आदेश देता येतील.

**पूर्वी दोषी ठरविण्यात आलेल्या विवक्षित व्यक्तींना वाढीव शिक्षा देणे.**

१९. (१) जिच्या बाबतीत कलम ११ किंवा कलम १५ अन्वये आदेश देण्यात आला आहे आणि जिल्हा अनुसूचीच्या भाग एकच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही अनुसूचित अपराधाबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस त्याच अपराधाबद्दल किंवा त्या विभागाच्या कक्षेत येणाऱ्या इतर कोणत्याही अनुसूचित अपराधाबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आले असेल तर, तिला, दोषसिद्धीनंतर जन्मठेपेची शिक्षा किंवा १० वर्षांपर्यंत वाढविता येईल अशा मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल.

(२) या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे, अशी व्यक्ती भारतीय दंड संहिते अन्वये किंवा कोणत्याही इतर कायद्यान्वये ज्या कोणत्याही आणखी किंवा इतर शिक्षेस पात्र असेल त्यास बाध येणार नाही. १८६० चा ४५.

**संशयास्पद स्थितीत आढळून येतील अशा विवक्षित नोंदणीकृत अपराध्यास शिक्षा.**

२०. जिच्याबाबतीत कलम ११ किंवा कलम १५ अन्वये आदेश देण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती कोणत्याही ठिकाणी अशा परिस्थितीत आढळून आली की, त्यामुळे—

(अ) ती चोरी किंवा लूटमार करण्याच्या किंवा ती करण्यास मदत करण्याच्या बेतात होती, अथवा

(ब) चोरी किंवा लूटमार करण्यासाठी तयारी करीत होती;

अशी न्यायालयाची खात्री झाली तर ती दोषसिद्धीनंतर तीन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या शिक्षेस पात्र होईल आणि तसेच एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेसही पात्र होईल.

**अभ्यस्त अपराध्यास अटक करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.**

२१. ज्या पोलीस पाटलास किंवा गावच्या पहारेकऱ्यास, कलम १८ अन्वये कोणत्याही व्यक्तीस अटक करण्याची संधी मिळालेली असताना तो त्याच्या नियंत्रणाधीन असलेल्या परिस्थितीत अशा व्यक्तीस अटक करण्यात कसूर करील त्याला, दोषसिद्धीनंतर, एक महिन्यापर्यंत वाढविता येईल अशा मुदतीची साध्या कैदेची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल अशी द्रव्यदंडाची शिक्षा, किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

**अधिकारितेस रोध.**

२२. या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाच्या किंवा आदेशाच्या वैधतेस कोणत्याही न्यायालयात हरकत घेण्यात येणार नाही.

**वैध कारवाईस रोध.**

२३. या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल राज्य शासन किंवा कोणतीही व्यक्ती याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई दाखल करून घेण्यात येणार नाही.

**अधिकार सोपविणे.**

२४. राज्य शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, त्याला या अधिनियमाच्या कलम २५ खालील अधिकार खेरीजकरून या अधिनियमाखालील जे कोणतेही अधिकार वापरता येतील ते अधिकार, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस (कोणत्याही असल्यास) अधीन राहून अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या अधिकाऱ्यास वापरता येतील.

**नियम करण्याचा अधिकार.**

२५. (१) राज्य शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वोक्त अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींबाबत तरतूद करता येईल :–

(अ) कलम ४ खालील नोटिशीचा नमुना आणि अशी नोटीस ज्या रीतीने बजावता येईल ती रीत;

(ब) अभ्यस्त अपराध्यांच्या नोंदणी-पुस्तकाचा नमुना आणि त्यात नोंदणी करावयाचा तपशील;

(क) कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये ज्या प्राधिकाऱ्यास, (नोंदणीकृत अपराधी) साधारणपणे ज्या ठिकाणी रहात असेल त्या ठिकाणातील कोणताही बदल किंवा नियोजित बदल कळविण्यात आला पाहिजे तो प्राधिकारी व तो ज्या रीतीने कळविला पाहिजे ती रीत;

८६०
१४५.

(ड) ज्यांच्या हालचालीवर निर्बंध घालण्यात आले आहेत अशा नोंदणीकृत अपराध्यांनी पाळावयाच्या निर्बंधांचे स्वरूप;

(इ) नोंदणीकृत अपराध्यास ओळख प्रमाणपत्र देणे आणि अशा प्रमाणपत्राची तपासणी करणे;

(फ) अपराध्यास, त्यांच्या हालचाली ज्या क्षेत्रापुरत्या मर्यादित करण्यात आल्या असतील ते क्षेत्र किंवा ज्या सुधारणा वसाहतीत त्यांना ठेवण्यात आले असेल त्या सुधारणा वसाहती सोडून जाण्याची परवानगी ज्या शर्तीन्वये देण्यात येईल त्या शर्ती;

(ग) अपराध्यांना ज्या अटींवर सुधारणा वसाहतीतून सोडून देता येईल त्या अटी;

(ह) सुधारणा वसाहतींचे कामकाज, व्यवस्था नियंत्रण आणि त्याच्यावर देखरेख ठेवणे, यात अशा सुधारणा वसाहतीत ठेवलेल्या व्यक्तींची शिस्त व वर्तणूक यांचा समावेश होतो.

(आय) खाजगी रीत्या चालविलेल्या वसाहतींना मान्यता देण्याच्या व प्रमाणपत्र देण्याच्या शर्ती व अशा वसाहतींना ज्या रीतीने मान्यता व प्रमाणपत्र देण्यात येईल ती रीत;

(जे) सुधारणा वसाहतींकरिता बिनसरकारी अवेक्षकांची नेमणूक;

(के) अभ्यस्त अपराध्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना अभ्यस्त अपराध्याबरोबर सुधारणा वसाहतीत राहण्यास परवानगी ज्या शर्तीन्वये व ज्या परिस्थितीत देता येईल त्या शर्ती व ती परिस्थिती;

(ल) ज्यांच्या हालचालींवर या अधिनियमान्वये निर्बंध घातले आहेत किंवा ज्यानां सुधारणा वसाहतीत ठेवण्यात आले आहे अशा सर्व व्यक्तींच्या प्रकरणांचे नियतकालिक पुनर्विलोकन;

(म) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येण्याजोगी कोणतीही इतर बाब;

(३) या अधिनियमान्वये नियम करताना राज्य शासनास अशी तरतूद करता येईल की, या नियमांपैकी कोणत्याही नियमाचे उल्लंघन हे शंभर रुपयापर्यंत वाढवता येईल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

[१][(४) या कलमान्वये केलेला नियम तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधान-मंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्या-संबंधी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये, या विषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल तर अशा निर्णयाची अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तो नियम केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो नियम अंमलात येणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही].

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३५ अन्वये मूळ पोटकलमाऐवजी 'पोटकलम (४)' दाखल करण्यात आले.

व्यावृत्ती. २६. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यास निर्बंध आदेश किंवा अटकावून ठेवण्याविषयींचा आदेश देण्याचे जे अधिकार असतील त्यास या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे बाध येणार नाही, आणि या अधिनियमान्वये दिलेला कोणताही आदेश किंवा निदेश हा, अशा कायद्यान्वये एखाद्या सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाशी जेथवर विरोधी असेल तेथवर, अशा कायद्यान्वये दिलेला आदेश अंमलात असेपर्यंत अंमलात असणार नाही, असे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

निरसन व व्यावृत्ती. २७. या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, पुढील अधिनियम निरसित होतील :–

(१) मुंबई अभ्यस्त अपराधी निर्बंध अधिनियम, १९४७. १९४७ चा मुंबई ५१.

(२) हैदराबाद अभ्यस्त अपराधी (निर्बंध आणि वसाहत) अधिनियम, १९५४ आणि १९५४ चा हैदराबाद २२.

(३) सौराष्ट्र अभ्यस्त अपराधी निर्बंध अधिनियम, १९५१. १९५१ चा सौराष्ट्र ३१.

परंतु, हे अधिनियम निरसित करण्यात आल्यामुळे पुढील गोष्टीस बाध येणार नाही :–

(अ) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाचा पूर्वीचा अंमल किंवा तदन्वये योग्यरीत्या केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट;

(ब) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क, विशेषाधिकार, किंवा पत्करलेले कोणतेही बंधन किंवा जबाबदारी;

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत लादलेली कोणतीही शास्ती, केलेली जप्ती किंवा दिलेली शिक्षा;

(ड) उपरोक्त कोणताही हक्क, विशेषाधिकार, बंधन, जबाबदारी, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा याबाबतची कोणतीही चौकशी, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना.

आणि अशी कोणतीही चौकशी, कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना हा अधिनियम संमत झाला नव्हता असे समजून चालू ठेवण्यात येईल किंवा अंमलात आणण्यात येईल; आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा लादण्यात येईल :

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकास अधीन राहून अशा रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये केलेली कोणतीही कार्यवाही किंवा केलेली कोणतीही उपाययोजना ही (तीत दिलेले आदेश व केलेले नियम, काढलेल्या नोटिशी आणि स्थापलेल्या किंवा मान्य केलेल्या वसाहती यांचा समावेश होतो) या अधिनियमाच्या तरतुदींशी जेथवर विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा कोणत्याही उपाययोजनेद्वारे ती निरसित करण्यात आली नसेल तर व निरसित करण्यात येईपर्यंत त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.

## अनुसूची

[कलम २ (ह) पहा]

### एक

१८६० चा ४५.

### भारतीय दंड संहितेखालील अपराध

१९४७ चा मुंबई ५१.
१९५४ चा हैदराबाद २२.
१९५१ चा सौराष्ट्र ३१.

### प्रकरण बारा

| कलमे | |
|---|---|
| २३१ | नाणे नकली तयार करणे. |
| २३२ | भारतीय नाणे नकली तयार करणे. |
| २३३ | नाणे नकली तयार करण्याचे साधन बनविणे किंवा विकणे. |
| २३४ | भारतीय नाणे नकली तयार करण्याचे साधन बनविणे किंवा विकणे. |
| २३५ | नाणे नकली तयार करण्याच्या कामी वापरण्याकरता साधन किंवा सामग्री कब्जात बाळगणे. |
| २३९ | कोणतेही नाणे नकली आहे याची जाणीव असताना ते सुपूर्द करणे. |
| २४० | भारतीय नाणे नकली आहे याची जाणीव असताना ते सुपूर्द करणे. |
| २४२ | एखाद्या व्यक्तीने नकली नाणे कब्जात आले तेव्हा ते नकली असल्याचे तिला माहीत असताना ते कब्जात बाळगणे. |
| २४३ | एखाद्या व्यक्तीने भारतीय नाणे कब्जात आले तेव्हा ते नकली असल्याचे माहीत असताना कब्जात बाळगणे. |

### प्रकरण सोळा

| | |
|---|---|
| ३०४ | 'खून' या सदरात न मोडणारा सदोष मनुष्यवध. |
| ३०७ | खूनाचा प्रयत्न करणे. |
| ३०८ | सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न करणे. |
| ३११ | ठग असणे. |
| ३२४ | घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक दुखापत करणे. |
| ३२५ | इच्छापूर्वक जबर दुखापत पोचवण्याबद्दल शिक्षा. |
| ३२६ | घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे. |
| ३२७ | मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृत्य करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत करणे. |
| ३२८ | अपराध करण्याच्या हेतूने विष इत्यादींच्या सहाय्याने दुखापत करणे. |
| ३२९ | मालमत्ता जबरीने घेण्यासाठी किंवा अवैध कृत्य करण्यास जबरीने भाग पाडण्यासाठी दुखापत करणे. |
| ३३२ | लोक सेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत करणे. |
| ३३३ | लोक सेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक जबर दुखापत करणे. |
| ३४७ | मालमत्ता जबरीने घेण्याकरिता किंवा अवैध कृत्य करण्यास भाग पाडण्यासाठी गैर परिरोध. |

कलमे

३६५ गुप्तपणे आणि गैरपणे एखाद्या व्यक्तीस बंधनात ठेवण्यासाठी तिला पळवून नेणे किंवा तिचे अपहरण करणे.

३६६-अ. अज्ञान मुलगी अनैतिक कृत्यासाठी मिळविणे.

३६६-ब. परकीय देशातून मुलीची आयात करणे.

३६८ पळवून नेलेल्या किंवा अपहरण केलेल्या व्यक्तीस गैरपणे लपवून ठेवणे किंवा परिरुद्ध करून ठेवणे.

३६९ दहा वर्षांखालील बालकाच्या अंगावरील वस्तू चोरण्याच्या उद्देशाने त्यास पळवून नेणे किंवा त्याचे अपहरण करणे.

**प्रकरण सतरा**

३७९ चोरी.

३८० राहण्याचे घर वगैरेतील चोरी.

३८२ चोरी करण्याकरिता मृत्यु, दुखापत किंवा निरोध घडवून आणण्याची पूर्वतयारी करून चोरी करणे.

३८४ बलाने घेणे.

३८५ बलाने घेण्याकरिता एखाद्या व्यक्तीला मृत्यु किंवा जबर दुखापत करण्याची भीती घालणे.

३८६ एखाद्या व्यक्तीस मृत्यु किंवा गंभीर दुखापती करण्याची भीती घालून बलाने घेणे.

३८७ बलाने घेण्यासाठी एखाद्या व्यक्तीला मृत्यू किंवा गंभीर दुखापत करण्याची भीती घालणे.

३९२ जबरी चोरी.

३९३ जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करणे.

३९४ जबरी चोरी करताना स्वेच्छेने दुखापत करणे.

३९५ दरवडा.

३९७ मृत्यु किंवा गंभीर दुखापत करण्याचा प्रयत्न करून जबरी चोरी करणे किंवा दरवडा घालणे.

३९८ प्राणघातक शस्त्राने सुसज्ज असताना जबरी चोरी करण्याचा किंवा दरवडा घालण्याचा प्रयत्न करणे.

३९९ दरवडा घालण्यासाठी तयारी करणे.

४०० दरवडेखोरांच्या टोळीपैकी असणारी.

४०१ चोरांच्या टोळीपैकी असणे.

४०२ दरवडा घालण्यासाठी एकत्र जमणे.

४११ चोरलेली मालमत्ता अप्रामाणिकपणे घेणे.

४१४ चोरलेली मालमत्ता लपवून ठेवण्यास सहाय्य करणे.

४५१ कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याकरिता घरात अनधिकार प्रवेश करणे.

४५२ दुखापत, प्रहार करण्याची किंवा अवैध निरोधात ठेवण्याची तयारी करून घरात अनधिकार प्रवेश करणे.

४५३ चोरून घरात अनधिकार प्रवेश करणे किंवा घर फोडणे.

४५४ कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याकरिता चोरून घरात अनधिकार प्रवेश करणे किंवा घरफोडी करणे.

कलमे

४५५ दुखापत करण्याची, प्रहार करण्याची किंवा गैर निरोध करण्याची तयारी करून छपून बसून घरात अनधिकार प्रवेश करणे किंवा घर फोडणे.

४५६ रात्रीच्या वेळी चोरून घरात अनधिकार प्रवेश करणे किंवा घर फोडणे.

४५७ कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेला अपराध करण्याकरिता रात्री चोरून घरात अनधिकार प्रवेश करणे किंवा घर फोडणे.

४५८ दुखापत किंवा प्रहार करण्याची किंवा गैर निरोध करण्याची तयारी केल्यावर रात्री चोरून अनधिकार प्रवेश करणे किंवा घर फोडणे.

४५९ चोरून घरात अनधिकार प्रवेश करताना किंवा घर फोडताना गंभीर दुखापत करणे.

४६० रात्री चोरून घरात अनधिकार प्रवेश करण्यात किंवा घर फोडण्यात संयुक्तपणे भाग घेणाऱ्या व्यक्तींपैकी एकाने जीव घेतला असता किंवा गंभीर दुखापत केली असता त्या सर्व व्यक्ती शिक्षेस पात्र असणे.

**दोन**

१९५६ चा १०४. स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यवहारास आळा घालण्याबाबत अधिनियम, १९५६ या खालील अपराध.

४ वेश्याव्यवसायापासून झालेल्या कमाईवर उपजीविका चालवणे.